MHRG110000862017

## नियमित दिवाणी दावा क्र. १३/२०१७ मधील
## निशाणी क्र. ५५ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज वादींनी न्यायालयीन आयुक्तची नेमणुक करण्याकरिता सादर केला आहे. वादींनी नमुद केले की, दावामिळकत ही वादींच्या मालकी वहिवाटीमध्ये आहे. प्रतिवादींनी जोरजबरदस्तीने दावामिळकतीवर बांधकाम सुरु केले आहे. सदरचा दावा दाखल करतेवेळी तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज देखील सादर केला होता. मा. न्यायालयाने एकतर्फी मनाई हुकुम आदेश पारीत केला होता. त्यानंतर प्रतिवादींनी म्हणणे व कैफियत दाखल केली. मा. न्यायालयाने नि. क्र. ५ वरील तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज निकाली काढला व अंतिम निकाल होईपर्यंत दावामिळकतीत बांधकाम करु नये असा आदेश पारीत केला.

२. वादींनी पुढे नमुद केले की, दिनांक १६.११.२०१७ रोजी निशाणी क्र. ३२ खाली न्यायालयीन आयुक्त नियुक्तीकरिता अर्ज दिला होता. सदरचा अर्ज मंजुर करण्यात आला. मा. न्यायालयाने वकील श्री. शेडगे यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नियुक्ती केली होती. त्यांनी दावामिळकतीच्या ठिकाणी जावुन पाहणी केली व त्याबाबतचा अहवाल न्यायालयात सादर केला. सदर अहवालासोबत दावामिळकतीची छायाचित्रे दाखल केली आहेत. सदर छायाचित्राची पाहणी केल्यास प्रतिवादींच्या इमारतीचे काम अर्धवट असल्याचे दिसत आहे. प्रतिवादीने मा. न्यायालयाच्या आदेशाचा भंग करुन बांधकाम पुर्ण केले आहे. दावामिळकतीवर प्रतिवादींनी केलेले वाढीव काम न्यायालयासमोर येणे महत्वाचे

आहे. म्हणुन सदरचा अर्ज मंजुर करण्याचा यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी निशाणी क्र. ५७ वर त्यांचे म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास विरोध दर्शविला आहे. यापुर्वी न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करण्यात आली होती. पुन्हा तया कारणांसाठी न्यायालयीन आयुक्तची नेमणुक करण्याची आवश्यकता नाही. म्हणुन सदर अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अभिलेखावरील दस्तऐवजाची पाहणी केली असता असे दिसुन येते की, यापुर्वी न्यायालयीन आयुक्त म्हणुन वकील श्री. शेडगे यांची नेमणुक करण्यात आली होती. त्यांनी अहवाल सादर केलेला आहे.

५. येथे नमुद करणे महत्वाचे आहे की, प्रस्तुतचा दावा अनाधिकृत बांधकाम काढुन टाकण्याकरिता व निरंतर मनाई हुकुमाच्या ताकीदीकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी दावामिळकतीवर किती बांधकाम केले किंवा कसे याकरिता न्यायालयीन आयुक्तची नेमणुक करणे रास्त व योग्य ठरणार नाही. कारण दावामिळकतीच्या वस्तुःस्थितीबाबत यापुर्वी न्यायालयीन आयुक्तची नियुक्ती करण्यात आली होती व त्याबाबतचा सविस्तर अहवाल अभिलेखावर दाखल आहे. दावामिळकतीवर किती बांधकाम करण्यात आले याकरिता वादींनी स्वतंत्र पुरावा दयावा लागेल. केवळ प्रतिवादींनी बांधकाम पुर्ण केले किंवा कसे याकरिता न्यायालयीन आयुक्तांची नियुक्ती करणे विधीसंगत होणार नाही. म्हणुन मी खालील आदेश पारीत करतो.

**<u>आ दे श</u>**

निशाणी क्र. ५५ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2022.08.12 18:06:41 +0530

माणगांव,
दिनांक – १२.०८.२०२२

(जी. सी. फुलझळके)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माणगांव